# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 10/02/2018 (शनिवार)
# (संध्याकाळ)

---

## फसवणुक

पो.स्टे. बोरी :- अंतर्गत 1 किमी अंतरावर मौजा बुटीबोरी टाउन येथे दिनांक 05/11/2017 ते दिनांक 02/02/2018 चे दरम्यान फिर्यादी नामे- रामचंद्र गणपतराव पारधी, वय 47 वर्ष, रा. वार्ड नं 5, हनुमान मंदिर, बुटीबोरी जि.नागपूर याने काढलेल्या पॉलिसीवर पुन्हा 30,00,000/- रूपयाचे झिरो टक्कावर लोन देण्याचे आमीष दाखवून व फिर्यादीच्या मोबाईल फोनवर 1) मो.क्र. 9763335988 वरून कॉल करणारा अनोळखी व्यक्ती वय अंदाजे 23 ते 24 वर्ष 2) ज्योती वर्मा 3) शुक्ला 4) मोहीम सकसेना 5) थापाजी 6) राजीवकुमार 7) अमीत चव्हाण 8) विशाल शर्मा 9) गोविंद शर्मा 10) सुरेश सिंग 11) नेहा मॅडम यांनी वेगवेगळया नावाने फोन करून फिर्यादीस एकुण त्याचे बॅक खात्यामधून 10,06,000/- रूपये त्यांच्या बॅक खात्यामधे टाकायला लावुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी विरुध्द कलम 420, 467 भादंवि. सहकलम 66 (ड) आयटी अक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. चांदेवार हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो.स्टे. उमरेड :- अंतर्गत 3 कि. मी अंतरावर मोहपा फाटा दिनांक 09/02/2018 चे 12.00 वा. दरम्यान शिवनाथ सोनबा शेळकी, वय 60 वर्ष, रा. जोगीठाणा उमरेड हा बकऱ्या व मेंढया चारतांना, त्यांना तलावात पाणी पाजण्यास नेल्याने तो तलावात पाय घसरून पाण्यात पडुन बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे - विठ्ठल सोनबा शेळकी, वय 70 वर्ष, रा. जोगीठाणा उमरेड यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार श्री. अरविंद पारधी या करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर